महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका.
जावक क्र. मआ/मुले/२०५६
दिनांक :- १९/१०/२०२०

## सुधारित कार्यालयीन आदेश

**विषय :- पुणे महानगरपालिकेतील विविध खात्यांमार्फत करण्यात आलेल्या विविध कामांचे व खरेदीचे, तसेच सल्लागार / त्रयस्थ गुणवत्ता तपासणी संस्था यांचे देयक अदा करणेबाबत**
**संदर्भ :- कार्यालयीन आदेश जावक क्र. मआ/द/८६३, दि. १७/०९/२०२०**

पुणे महानगरपालिकेकडील विविध खात्यांमार्फत करण्यात आलेल्या विविध कामांचे व खरेदीचे, तसेच सल्लागार / त्रयस्थ गुणवत्ता तपासणी संस्था यांचे देयक खात्यामार्फत प्रदान करण्यात येतात. तथापि खात्यांमार्फत प्रदान करण्यात येणाऱ्या देयक / बिलांबाबत विविध तक्रारी प्राप्त होत आहेत. यास्तव संदर्भांकित कार्यालयीन आदेश पारित करण्यात आले होते. तथापि विविध खात्यांमार्फत देयके अदा करणेसाठी अंतर्गत अर्थान्विक्षक विभागाकडे वेगवेगळ्या पध्दतीने सादर केली जात आहेत. यामध्ये एकवाक्यता व सुसूत्रता येण्यासाठी संदर्भांकित कार्यालयीन आदेश खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

यापुढे निविदा रक्कम रूपये ३.०० कोटींचे पुढील विविध खात्यांची देयके (बिले) अदा करताना संबंधित विभागाचे अतिरिक्त आयुक्त यांची मान्यतेने खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अदा करण्यात यावेत.

| अ.क्र. | संबंधित सक्षम अधिकारी | देयक अदा करणेचे मान्यतेचे अधिकार |
|---|---|---|
| १ | खातेप्रमुख | निविदा रक्कम रूपये ३.०० कोटीपर्यंत |
| २ | संबंधित विभागाचे अतिरिक्त महापालिका आयुक्त | निविदा रक्कम रूपये ३.०० कोटींचे वर |

संबंधित खातेप्रमुख यांनी अतिरिक्त महापालिका आयुक्त यांचेकडे देयके मान्यतेसाठी सादर होताना कमीत कमी मात्र आवश्यक त्या स्तरावर विनाविलंब व अचूक तपासणी करून सादर करावीत. जेणेकरून त्वरीत देयके अदा करणे व त्यामध्ये अनावश्यक विलंब टाळणे शक्य होईल. अतिरिक्त आयुक्त यांचेकडील मान्यतेसाठीची देयके संबंधित खात्याने देयक मान्यता निवेदनासह मुख्य लेखा व वित्त विभाग यांचेमार्फत सादर करावीत. मुख्य लेखा व वित्त विभागाने प्रकरणी वित्तीय दृष्टीकोनातून पूर्व तपासणी करून शिफारशीसह देयके मान्यतेसाठी सादर करावीत व अतिरिक्त महापालिका आयुक्त यांचे मान्यतेनंतर विनाविलंब देयके अदा करण्याची कार्यवाही करावयाची आहे.

**केंद्र व राज्य शासन, शासनअंगीकृत संस्था / महामंडळे तसेच** पुणे महानगरपालिकेचे उपक्रम यासाठीची देयके या **आदेशातून वगळण्यात येत आहेत.**

(विक्रम कुमार)
१९/१०
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका.